January 2022 ISBN 978-93-93079-05-3

# ASIAN JOURNAL OF MULTI DISCIPLINARY RESEARCH STUDIES

***Peer Reviewed Multilingual Research Journal***

आजादी के 75 वर्ष

आजादी का अमृत महोत्सव

*Azadi Ka Amrit Mahotsav*

Chief Editor

Dr. Lahorkar Balaji Rangnathrao

# PEER REVIEW COMMITTEE

Our Peer review committee scrutinizes and regulates the quality of content to be published, if required the committee invites experts in the field to review and comment on manuscripts received. The manuscripts submitted to our journal first go through an initial screening by the editorial board. Those manuscripts clear the screening is sent to at least two experts for peer review. Peer reviewers independently make a recommendation to the journal editor as to whether the manuscript should be rejected or accepted (with or without revisions). The journal editor considers all the feedback from peer reviewers and makes an informed decision to accept or reject the manuscript.

| | |
|---|---|
| **1) Dr B W Somatkar, HoD English Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** | **2) Dr Bharat Avhale, Dept of History, R Z College, Malegaon, Dist Washim.** |
| **3) Dr D K Rathod, HoD Economics Dept. Gajanan Maharaj College, Borgaon Manju Tq Dist Akola.** | **4) Dr D N Badar, Panjabrao Jadhao College, Mehkar.** |
| **5) Dr Dilip Arjune, HoD Economics Dept., JES College, Jalna.** | **6) Dr G B Ghayal, Librarian Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** |
| **7) Dr M R Shinde, HoD Sociology Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** | **8) Dr P H Barad, Librarian, SPM College, Chikhali, Dist Buldana.** |
| **9) Dr P R Junghare, HoD History Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** | **10) Dr R G Suralkar, HoD Political Science Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** |
| **11) Dr Rajesh Maske, Dept of English, RA College, Washim.** | **12) Dr S T Kute, HoD Economics Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** |
| **13) Dr S V Jadhao, Panjabrao Jadhao College, Mehkar.** | **14) Dr Santosh Dhamne, HoD Dept of Economics, TJ College, Washim.** |
| **15) Dr Smt L R Jawale, HoD Marathi Dept., R Z College, Malegaon, Dist Washim.** | **16) Dr Smt M P Khedekar, HoD Marathi Dept., Uttamchand Bagadia College, Risod, Dist Washim.** |
| **17) Dr Smt S M Pawar, HoD Marathi Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** | **18) Dr Smt V R More, HoD Home Economics Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** |
| **19) Dr Umesh Patil, Dept of English, RDG Mahila College Akola.** | **20) Dr V P Jadhao, Librarian, TJ Mahavidyalaya, Washim.** |
| **21) Dr Vijay Gaikwad, Librarian, Pushpadevi Patil College, Risod, Dist Washim.** | |

# Table of Contents


| Sr. No. | Title of the Article | Name of the Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | 'दिनांक २२ मार्च - जागतिक जल दिन' आपल्याला गंभीर परिणामांची जाणीव आहे काय? | प्राचार्य, डॉ बालाजी रंगनाथराव लाहोरकर<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय मेहकर, जिल्हा बुलडाणा. | 01 |
| 2 | कसे अभ्यासावे विज्ञान? | डॉ. शेख एम. डब्ल्यू. एच.<br>मुख्याध्याक<br>जि. प. हायस्कूल अर्धापूर जि. नांदेड. | 05 |
| 3 | **E-Learning as a Solution for Teaching English Language** | Prof. Dr. B.W.Somatkar<br>HoD, Dept. of English<br>Smt. Sindhutai Jadhao Arts and Sci. College Mehkar. Dist- Buldana. | 07 |
| 4 | सावित्रीबाई फुले यांच्या प्रमाणेच समाज सुधारणा घडवून आणण्यासाठी लढणारी दुर्दम्य इच्छाशक्ती असणारी मुस्लिम स्त्री म्हणजे फातिमा शेख. | डॉ जयश्री लक्ष्मणराव भोसीकर,<br>सहाय्यक प्राध्यापक,<br>सहयोग सेवाभावी संस्थेचे अध्यापक महाविद्यालय, विष्णूपुरी, नांदेड. | 11 |
| 5 | आदिवासी विकासातील अडथळे | प्रा.डॉ.मेघराज रा.शिंदे<br>श्रीमती सिंधुताई जाधव<br>कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर | 14 |
| 6 | आदिवासी विकासाचे दृष्टीकोन | प्रा.अभय जायभाये<br>एन.एस.एस.संचालक<br>शिवाजी विद्यापिठ, कोल्हापुर | 19 |
| 7 | आदिवासींच्या विकासाबाबत घटनात्मक तरतूदी | प्रा.डॉ. आर.जी.सुरळकर<br>श्रीमती सिंधुताई जाधव<br>कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर | 23 |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | क्रीडा शिक्षण | प्रा. डॉ. संगीता मंगेश खडसे<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान<br>महाविद्यालय मेहकर, जि.बुलढाणा. | 28 |
| 9 | गृह अर्थशास्त्र च्या माध्यमातून स्वयंरोजगार व स्त्री सक्षमीकरण | प्रा. डॉ. वैशाली रा. मोरे<br>गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय<br>मेहकर, जिल्हा बुलडाणा. | 31 |
| 10 | संतांची ईश्वरविषयक संकल्पना | प्रा. डॉ. सविता माधवराव पवार<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान<br>महाविद्यालय, मेहकर. | 35 |
| 11 | ICT Skills and Competencies of Librarians in Colleges of Sant Gadge Baba Amravati University, Amravati | Dr Gajanan Baliram Ghayal<br>Director knowledge resource centre shrimati Sindhutai Jadhav Arts and Science Mahavidyalay Mehkar district Buldhana. | 38 |
| 12 | गणित विषय अध्ययनातून विद्यार्थ्यांत संक्रमित होणारी मूल्य | श्री चव्हाण नवीन लिंबराज<br>सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव,<br>ता. माजलगाव, जि.बीड. | 45 |
| 13 | कोरोना के परिप्रेक्ष्य में : बदल गये दस्तूर | प्रा. धन्यकुमार जिनपाल बिराजदार, सोलापुर,<br>महाराष्ट्र 9423330737 | 47 |
| 14 | लोकसंख्या वाढ भारतीय अर्थ व्यवस्थे समोरील आव्हान | डॉ. धनाजी दगडूराव खेबडे<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,<br>अंबाजोगाई, जि.बीड. | 52 |
| 15 | **Tanqeer Aur Naqqad** | Siraj Anwar Mohammed Miran<br>Secondary Teacher<br>Z.P. High School, Tamsa Nanded. | 55 |

**08**

# क्रीडा शिक्षण

प्रा. डॉ. संगीता मंगेश खडसे
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय
मेहकर, जि.बुलढाणा.

**टोकियो ऑलिंपिकमध्ये काही खेळाडूंनी देदीप्यमान कामगिरी केली. मात्र भारताच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आपणाला तेवढी बक्षिसे मिळाली नाहीत. म्हणून शालेय स्तरावर खेळाला महत्त्व देऊन खेळाडू घडवावे लागतील पाठ्यपुस्तकांत खेळाडूबद्दलचे लेख घेऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करता येईल. तसेच खेळाडूंच्या जीवनातील महत्त्वाचे संघर्षशील प्रसंग सांगितले पाहिजेत. खेळ हे अनुत्पादक बाब न मानता त्याकडे करिअर म्हणून पाहिले पाहिजे. पी व्ही सिंधू ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदके जिंकणारी पहिली भारतीय बॅडमिंटनपटू ठरली आहे. ऑलिम्पिक पदक जिंकणारी साक्षी मलिक पहिली भारतीय महिला पैलवान रियो ऑलिंपिक मध्ये कास्य पदक जिंकले. वेटलिफ्टिंग मध्ये रौप्य पदक जिंकणारी मीराबाई पहिली भारतीय महिला ठरली आहे.**

टोकियो मध्ये नुकत्याच ऑलिंपिक स्पर्धा संपन्न झाल्या. साऱ्या विश्वाचे अवधान खेचून घेणाऱ्या या स्पर्धा असतात प्रत्येक राष्ट्राच्या सन्मान आणि गौरवाचे मानचिन्ह असणाऱ्या या स्पर्धा विश्वसन्मानाचे प्रतीक समजल्या जातात. प्रत्येक राष्ट्राला या स्पर्धांमधील पारितोषिके आत्मसन्मानाचे प्रतीक असतात. त्या देशातील नागरिकांना हा राष्ट्राचा आत्मसन्मान प्राणापेक्षाही प्रिय असतो. म्हणूनच 2020 मध्ये नीरज चोप्राने सुवर्णपदकावर आपले नाव मुद्रांकित केले. आणि अवघा भारत प्रफुल्लित झाला. केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी नीरज चोप्रावर कोट्यावधी रुपयांच्या बक्षिसांचा अक्षरशः वर्षाव केला. महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी नीरज चोप्रा यांच्याशी संवाद साधून राज्याच्या वतीने महासन्मान करण्याचा संकल्पही व्यक्त केला आहे. नीरज चोप्राने सुवर्णपदक जिंकल्यानंतर बजरंग पुनियाने कुस्तीमध्ये कास्य पदक जिंकले आणि भारताने ऑलिंपिकमध्ये आतापर्यंतची सर्वोत्तम पदकाची ऐतिहासिक नोंद केली. भारताने एक सुवर्ण, दोन सिल्वर, चार ब्रांझ पदके जिंकून अर्थात 7 पदके जिंकून आतापर्यंतच्या पदकप्राप्तीमध्ये भारताने एक नवा इतिहास रचला आहे. 2012 मध्ये लंडन ऑलिम्पिकमध्ये दोन सिल्वर आणि चार ब्रांझ पदके प्राप्त केली होती. टोकियो ऑलिंपिक 2020 मध्ये भालाफेक स्पर्धेत नीरज चोप्राच्या सुवर्णपदकाशिवाय वेट्लिफ्टर मीराबाई चानूने आणि कुस्तीमध्ये रविकुमार दहिया या दोघांनी सिल्वर पदक जिंकले आहे. बॅडमिंटनपटू बॉक्सिंग मध्ये आणि भारतीय पुरुष हॉकी संघाने प्रत्येक 11 ब्राँझ जिंकून 461 सुवर्ण 2 सिल्वर असे एकूण सात पदके प्राप्त करून भारताचा सन्मान अभिमानाने गौरव अंकित केला आहे.

या टोकियो 2020 ऑलिंपिकमध्ये अमेरिकेने 39 सुवर्णपदकासह एकूण 113 पदके जिंकून विश्वात सर्वोच्च स्थान प्राप्त केले आहे. चीनने 32 सुवर्णासह

88 पदके जिंकून दुसरे स्थान पटकाविले आहे. रशिया 20 सुवर्णपदकासह 71 पदके जिंकून विश्वात तिसऱ्या स्थानी आहे. ग्रेटब्रिटन 22 सुवर्ण 58 पदके जिंकून पाचव्या स्थानी आहे. ऑलिंपिक स्पर्धा विश्वातील राष्ट्रांच्या खेळातील विक्रमाची यशोगाथा आभाळाच्या भाळावर मुद्रांकित करून आत्मगौरवाची कीर्तीपताका अभिमानाने फडकवत असतात. कोणतेही राष्ट्र विजयाच्या प्रगतीच्या अविरत आणि अखंड मार्गक्रमण करीत असते. क्रीडा हे स्वाभिमान आणि सन्मानाचे प्रतीक असते. राष्ट्रभक्तीचा ऊर्जस्वल, अखंड अविष्कार असतो. राष्ट्राच्या या देदीप्यमान धवल कीर्तीमानाची प्रेरणा घेऊन देशातील नागरिक राष्ट्र प्रगतीची अविरत वाटचाल करीत असतात.

आपल्या देशातील खेळाडूंनी टोकियो ऑलिम्पिकमध्ये खरेतर प्रशंसनीय गौरवास्पद कामगिरी केली आहे. विक्रमवीरांचे अभिनंदन करताना प्रत्येक भारतीयाचा माथा उन्नत होतो. माननीय पंतप्रधानांची अविरत प्रेरणा भारतीय खेळाडूंना होतीच. शिवाय "खेलो इंडिया खेलो" सारख्या उपक्रमामुळे ऑलिंपिक खेळामध्ये भारतीय क्रीडावीरांनी दैदिप्यमान यश प्राप्त करून प्रत्येक भारतीयांची मान आणि शान उंचावली आहे. असे असले तरी आपल्या देशापेक्षा लोकसंख्येने आणि आकाराने अगदी लहान असलेल्या देशांनी पदकप्राप्तीचे विक्रम प्रस्थापित केले आहेत. आपण जागतिक क्रमवारीत 48 व्या क्रमांकावर आहोत आपल्या देशातील युवकांमध्ये क्रीडाप्रतिभा कुठेही कमी नाही. तरीपण आपण 48 व्या स्थानावर आहोत याच्या चिंतनाची गरज आहे.

विश्वक्रमवारीतील सर्वोच्च स्थानी विराजित असलेल्या देशात क्रीडा हा भवितव्याचा अर्थात करिअरचा अत्यंत श्रद्धेचा विषय मानला जातो. शालेय वयात त्यांची सुप्त क्रीडाप्रतिभा घर आणि शाळांमधून निश्चित केली जाते प्रेरणा आणि प्रोत्साहन देऊन क्रीडाप्रतिभा जाणीवपूर्वक संगोपलि जाते. पूरक उपक्रम, नेमका सराव, उत्तम प्रशिक्षक आणि आहारविहाराचे काटेकोर नियमन आणि नियोजन केले जाते. शाळांमधून शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या क्रीडाप्रतिभेचा सन्मान केला जातो. आपल्याकडे ग्रामीण भागात शालेय विद्यार्थी शाळा सुटल्यावर खेळत असतील तर आई बाप त्याला प्रेरणा, प्रोत्साहन, न देता 'खेळण्याने पोट भरत नाही, अभ्यास कर' असे म्हणतात. यामुळे प्रतिभा अव्हेरली अथवा अपमानीत केली जाते. त्यामुळे खळखळणाऱ्या उत्साह हळूहळू संपुष्टात येतो. त्यातल्या त्यात एक समाधानाची बाब आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून या विद्यार्थ्यांनी राज्य अथवा राष्ट्र स्तरापर्यंत क्रीडा नैपुण्यात झेप घेतलेली आहे. त्या विद्यार्थ्यांना उत्तीर्णतेसाठी गुणांची प्रतिपुरती केली जाते. घरातून क्रीडा प्रतिभेचा गौरव करण्यासाठी प्रेरणा देण्यासाठी पालकांच्या आणि एकूणच समाजाचे प्रबोधन शाळा, स्वयंसेवी संस्था आणि शासनाने करणे अगत्याचे आहे.

शालेय स्तरावर विशेषता माध्यमिक उच्च माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमात पर्यायाने पाठ्यपुस्तकांमधून विश्वस्तरावर आणि राष्ट्रीय स्तरावर मानांकन प्राप्त केलेल्या विश्वविक्रम प्रस्थापित केलेल्या खेळाडूंचे चरित्र अथवा त्यांचे असाधारण प्रयास शब्दांकित करून यशाचा धवल क्रांतिकारी विक्रम विद्यार्थ्यांपुढे सादर करावा. प्रेरणेचे दीप नैराश्य पसरलेल्या मनात नव्या आशा पल्लवीत करतात. शाळांमध्ये क्रीडाशिक्षकही नियुक्त केलेले असतात; पण त्यांना प्रेरित करून क्रीडांगणावर नैपुण्य प्रस्थापित करण्यासाठी वातावरण निर्माण केले जात नाही. शारीरिक शिक्षणाच्या तासात मागे राहिलेला अभ्यासक्रम पूर्ण केला जातो. क्रीडा प्रतिभा आणि नैपुण्याला सन्मानाच्या आसनावर विराजित करायला शिकू म्हणजे भविष्यातील ऑलिम्पिकमध्ये विश्वातील पहिल्या दहा देशांमध्ये तरी स्थान मिळेल. भारतीय समाजव्यवस्थेत खेळही अनुत्पादक समजली जाणारी बाब आहे. ही धारणा बदलणे आवश्यक आहे. 'पोरखेळ करणे, आयुष्याचा खेळखंडोबा करणे' यासारख्या वाक्यप्रचारांमधून खेळांचे दुय्यमत्व महत्व अधोरेखित केले जाते. शाळांतून विशेष प्रोत्साहन देऊन क्रीडानैपुण्य अविरत सन्मानित करणे, तालुका जिल्हास्तरावर निवासासह क्रीडांगणे विकसित करणे, क्रीडा शिक्षकांना उच्च दर्जाचे, प्रशिक्षण देणे, विद्यार्थी आणि युवकांमधील स्फूर्ती चेतना जागृत करणे हे यावरील उपाय आहेत. तसेच पी व्ही सिंधू ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदके जिंकणारी पहिली भारतीय बॅडमिंटनपटू ठरली आहे. ऑलिम्पिक पदक जिंकणारी साक्षी मलिक पहिली भारतीय महिला पैलवान रियो ऑलिंपिक मध्ये कास्य पदक जिंकले. वेटलिफ्टिंग मध्ये रौप्य पदक जिंकणारी मीराबाई पहिली भारतीय महिला ठरली आहे.

Coordinator - IQAC
Smt. Sindhutai Jadhao College
Mehkar, Dist. Buldana

Coordinator - IQAC
Smt. Sindhutai Jadhao College